# जगातील ५०० सर्वोत्तमांत दोन भारतीय !

**समर खडस**

**मुंबई, ११ जून :** एकविसाव्या शतकापुढच्याही भविष्याचा वेध घेत जगाला त्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या जगातील निवडक ५०० 'सर्वोत्तमां'मध्ये दोन भारतीयांनी आपले स्थान कोरले आहे. कोकणात जन्मलेले व सध्या कुवेत येथे स्थायिक झालेले अब्दुल रझ्झाक रुमाने हे विद्युत अभियंता तसेच स्थापत्य अभियंता असलेले दिल्लीचे किरण कपिला या दोघांनी अशी जागतिक मान्यतेची मोहर आपल्या नावावर उमटवून घेत भारताचा झेंडा जागतिक स्तरावर नेला असून ते आता बिल गेट्स ते सर आर्थर क्लार्क अशा ख्यातकिर्तांच्या पंक्तीत जाऊन बसले आहेत.

जॉन पेलॅम यांनी संपादित केलेल्या 'द ग्लोबल ५०० - लीडर्स फॉर द न्यू सेंच्युरी' या ग्रंथात रुमाने आणि कपिला यांचा समावेश करण्यात आला आहे. विद्युत अभियांत्रिकीचे पदवीधर असणाऱ्या रुमाने यांनी अभियांत्रिकीच्या विविध क्षेत्रांमध्ये आपल्या नैपुण्याचा



किरण कपिला






अब्दुल रझ्झाक रुमाने

ठसा उमटवल्याने त्यांची दखल या ग्रंथात घेण्यात आली आहे. अभियांत्रिकीच्या उत्पादन, आखणी, तपासणी अशा विविध क्षेत्रांमध्ये काम केलेले रुमाने हे विद्युत प्रणालीशी संबंधित विविध कामांमध्ये वाकबगार असल्याचे जागतिक पातळीवर मानले जाते. त्यांनी ब्रिटिश कौन्सिलमधून व्यवस्थापन व जागतिक व्यापार या विषयातही पदव्या प्राप्त केल्या आहेत. जागतिक पातळीवर नाव कमावणारे रुमाने यांचे प्राथमिक शिक्षण महाड तालुक्यातील चांडवे गावी तर माध्यमिक शिक्षण वहूर येथील फजनदार हायस्कूल येथे झाले आहे.

रुमाने यांनी फायर अलार्म सिस्टीम, टेलिफोन सिस्टीम, पब्लिक अॅड्रेस अॅण्ड कन्व्हेयींग सिस्टीम, इमर्जन्सी जनरेटींग सिस्टीम आदींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिल्याची नोंद व या क्षेत्रातील त्यांचा महत्त्वपूर्ण अनुभव याची नोंद पुस्तकात घेण्यात आली आहे. रुमाने यांच्या पाठोपाठ या ग्रंथात स्थान मिळविणारे किरण कपिला हे स्थापत्य अभियंता असून दिल्ली महापालिका, एअरपोर्ट **पान ८ पाहा ➤**

**पान १ वरून ➤** अॅथॉरिटी ऑफ इंडिया आदी संस्थांमध्ये त्यांनी आपल्या कौशल्याचा ठसा उमटविला आहे. सध्या 'इंटरनॅशनल कन्सलटन्टस् अॅण्ड टेक्नोक्रॅट्स'चे व्यवस्थापकीय संचालक आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री शिला दीक्षित यांच्या दिल्ली शहराच्या विकास कार्यक्रमात एक महत्त्वाचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले होते. कपिला यांचे हायवे, उड्डाण पूल, वाहतूक कोंडी, पर्यावरण, पर्यटन आदी विषयांमधील योगदान महत्त्वपूर्ण आहे. जागतिक बँक, एशियन डेव्हलपमेंट बँक आदी संस्थांना सल्ला देण्याचे कामही ते करतात.

## जगातील ५०० सर्वोत्तमांत दोन भारतीय !

इन्टरनॅशनल स्पेस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू व विख्यात विज्ञानकथा लेखक सर आर्थर क्लार्क यांची या पुस्तकाला प्रस्तावना आहे. '२००१ अ स्पेस ओडिसी' या पुस्तकाद्वारे सुमारे ३० वर्षांपूर्वीच २१व्या शतकाची झलक दाखविणाऱ्या क्लार्क यांच्या प्रस्तावनेमुळे या पुस्तकाला एक विश्वासार्हता प्राप्त झाली आहे. आपल्या प्रस्तावनेच्या पहिल्याच परिच्छेदात त्यांनी नमूद केले आहे की, जगाची लोकसंख्या ६०० कोटींच्या घरात गेली असून त्यातील ५०० माणसे निवडणे म्हणजे जवळपास सव्वा कोटी माणसांमागे एक माणूस निवडण्यासारखे हे कठीण काम आहे.

मानवाच्या प्रगतीचा आढवा घेताना क्लार्क यांनी म्हटले आहे की, प्रचंड मेहनतीला नशीब आणि हुशारी यांची जोड नसेल तर विख्यात होणे कठीण असते. हुशारी ही तुम्हाला तुमच्या पालकांकडून मिळते. योग्य वेळी योग्य ठिकाणी हजर राहिल्यास नशिबाचीही साथ मिळते, असे सांगून क्लार्क यांनी भविष्यात विश्वातील इतर बुद्धिमान जीवसृष्टीशी रेडिओ लहरी अथवा जवळून संपर्क साधण्याची शक्यता वर्तविली आहे.

पुस्तकाचे प्रमुख संपादक जॉन पेलॅम यांच्या बरोबरीने केट कोकर, कॅरीन कॅटो, बॉनी मून, हेलेन पार्क, अॅना पेरेझ, ज्युली ड्युओंग यांनीही काम पाहिले. पेलॅम यांच्या म्हणण्याप्रमाणे जगभरातून कला, तत्त्वज्ञान, इंजिनीअरिंगच्या विविध शाखा, वैद्यकीय क्षेत्रातील विविध शाखा, व्यापार, विविध क्षेत्रांमध्ये योगदान देणारे वैज्ञानिक यांच्यामधून ५०० माणसे निवडणे अत्यंत जोखमीचे काम होते. पुस्तकात नमूद करण्यात आलेल्या ५०० सदस्यांपैकी काही ज्येष्ठ सदस्य हे मागील शतकात महत्त्वाचे योगदान दिलेल्यांपैकी आहेत. तर काहींचे काम पाहता, येणाऱ्या शतकात ते मानवी इतिहासाला एका उंचीवर नक्कीच नेऊन ठेवतील याची खात्री संपादकांना वाटते. ■